मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ५८ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून २००४

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

**(फक्त खाजगी वितरणासाठी)**

## १०वी, १२वी नंतर पुढे काय?

१०वी १२वी नंतर पुढे काय हा यक्षप्रश्न अनेक कुलबांधवांना भेडसावणारा आहे. बी.ए.बी.एससी.बी.कॉम शिकून चांगली नोकरी मिळणे ही गोष्ट आता कालबाह्य झाली आहे, मेडिकल इंजिनिअरिंगचा खर्चहि अनेकांच्या आवाक्याबाहेरचा झाला आहे.

अशा परिस्थितीत व्यावसायिक शिक्षण घेऊन रोजगार/व्यवसायाच्या वाटा शोधणे गरजेचे झाले आहे. बदलत्या काळानुरूप माहिती शास्त्र, पर्यावरणशास्त्र, जेनेटिक इंजि., बायोटेक्नॉलॉजी, पर्यटन-हॉटेल मॅनेजमेंट, पॉलिमर इंजि., अपारंपरिक ऊर्जा, विषाणू संशोधन, वैद्यकीय संशोधन, कॉल सेंटर्स अशी रोजगाराची नवनवी क्षेत्रे निर्माण होत आहेत.

हितगुजमधून यासंबंधी वेळोवेळी माहिती/लेख प्रसिद्ध केलेले आहेत. याहि अंकांत या दृष्टीने उपयुक्त माहितीपर लेख समाविष्ट केले आहेत. यांतून कोण काय निवडील ते ज्याच्या त्याच्या शोधक नजरेवर अवलंबून आहे.

याबाबतचा एक गमतीदार किस्सा बरेच काही सांगून जाईल - एक उडाणटप्पू कॉलेज शिकणारा मुलगा मन लावून काही शिकत नाही म्हणून त्याचे वडील कष्टी होते. त्यांच्या एका मित्राने एक दिवस त्या मुलाला कानमंत्र दिला. मुलाने एक बी.पी. मोजण्याचे यंत्र खरेदी केले, एका डॉक्टरकडे बी.पी. मोजण्याचे शिक्षण घेतले आणि एके सकाळी पुणे-मुंबई-पुणे प्रवासात गाडीतल्या प्रवाशांचे बी.पी. मोजण्याचे काम सुरू केले. पहिल्याच दिवशी स्वारी सातआठशे रुपये कमावून खुष होऊन घरी परतली! तात्पर्य, 'योजकस्तत्र दुर्लभ:' हेच खरे!! - **संपादक**

***

## अर्थार्जनाचे साधन - स्वयंरोजगार

**- रामचंद्र नाडकर्णी**

उच्च शिक्षणापासून ते सामान्य शिक्षणापर्यंत कोणत्याही शिक्षणक्रमातून नोकरीप्रमाणेच स्वतंत्र व्यवसायही उपलब्ध होऊ शकतो. आज नोकरी मिळण्याची दुरावस्था लक्षात घेऊन स्वतंत्र व्यवसायाची दृष्टी ठेवूनच यापुढे शिक्षण घ्यावे लागेल. ही दृष्टी पुढच्या पिढीत येण्यासाठी लहानपणापासूनच उद्योजक संस्कार मुलावर व्हायला हवे. ही जबाबदारी केवळ शासनाची किंवा शिक्षणखात्याची नसून पालकांची देखील आहे.

आपल्या मुलाची मनोभूमिका स्वयंरोजगाराला पोषक कशी होईल यासाठी पालकाने प्रयत्नशील असायला हवे. त्याने याबाबतीत वेळोवेळी मुलांशी संवाद साधणे, उद्योजकांची सोप्या भाषेत लिहिलेली पुस्तके त्यांना वाचायला देणे, त्यांच्यातील उद्योगक्षमता वाढेल असे 'मकॅनो' सारखे खेळ त्यांना देणे असे अनेक प्रकार आहे.

एकदा लघुउद्योग करायचाच अशी मनोभूमिका तयार झाली की लघुउद्योगाबद्दल सर्व बाजूने माहिती मिळविली पाहिजे. लघुउद्योग स्थूलमानाने तीन प्रकारचे असतात. (१) उत्पादन, (२) व्यापार, (३) सेवा उद्योग

**उत्पादनात दोन प्रकार** असतात. (अ) स्वत:च्या कल्पकतेने निर्माण केलेले लोकोपयोगी उत्पादन, आणि (ब) मोठ्या उद्योगांना लागणारे छोटे छोटे स्पेअर पार्टस् बनविणे. बोल्टस्, नटस्, टूल्स्, औषधी बाटल्यांची झाकणे अशा कितीतरी गोष्टींचे उत्पादन आपल्या छोट्या वर्कशॉपमध्ये करता येण्यासारखे असते. *(पुढे पृ.५ वर....)*

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

# प्रतिष्ठान वृत्त

## गुणवंतांच्या पाठीवर कौतुकाची थाप - गरजवंतांना मदतीचा हात

### कार्यकारी मंडळ सभा

दर महिन्याच्या **दुसऱ्या** शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा घेण्याची प्रथा होती. पण अध्यक्षांना त्याऐवजी १ ला शनिवार सोयीचा होईल असे त्यांनी सूचविल्यावरून १ल्या शनिवारी सभा घेण्याची सुरवात केली होती. पण त्यांना १ ला शनिवारहि सोयीचा नाही असे त्यांच्या उपस्थितीवरून दिसून आले. त्यामुळे दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा घेण्याची पूर्वीची पद्धत पुन्हा चालू करण्यांत आली. सभेच्या दिवशी सायं. ५ वाजता कोणीहि कुलबांधव कार्यकारी मंडळाच्या भेटीसाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत १३ मार्च, १० एप्रिल आणि ८ मे रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. मार्च व एप्रिल मधील सभांचे अध्यक्ष होते सी. गो. खांबेटे तर मे महिन्यांतील सभेचे अध्यक्ष होते मोहनराव मराठे. पत्रव्यवहार, जमाखर्च इ. नित्य व्यवहाराशिवाय विशेष म्हणजे कार्यकारी मंडळाने वेंगुर्ले येथील सभासद श्रीधर केशव यांच्या पत्नीच्या आजारपणात झालेल्या ५० हजाराहून जास्त खर्चापोटी त्यांना आर्थिक मदत रु. ५ हजार व बिनव्याजी कर्ज स्वरूपात रु. २० हजाराचे सहाय्य करण्याचे ठरविण्यांत आले. (सभा दि. ९.५.२००४). तसेच कोणी ब्राह्मण उद्योजक हितगुजमधे आपली/आपल्या उद्योगाची माहिती छापू इच्छित असतील तर १६० शब्दांपर्यंत रु. ५०० घेऊन अशी माहिती छापण्यांत यावी असेहि ठरविण्यांत आले. (सभा दि. ८.४.२००४. मार्च मधील सभेत घटनादुरुस्तीबाबत विचार होऊन याबाबतचा प्रस्ताव पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेत विचारार्थ ठेवण्यांत यावा असे ठरविण्यांत आले. तसेच श्री. सी. गो. खांबेटे यांनी वैयक्तिक कारणासाठी यापुढे त्यांना कोषाध्यक्षपद सांभाळणे जमणार नाही असे सांगितल्यावरून १.४.२००४ पासून प्रभाकर दामोदर यांनी ही जबाबदारी घ्यावी असे त्यांच्या मान्यतेने ठरविण्यांत आले.

### गुणवत्ता पारितोषिके २००३-०४

१०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक/स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात-

१. **कै. कु. अमिता खांबेटे** पारितोषिके -

इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत **मराठे परिवारांत सर्वाधिक गुण** मिळवणाऱ्यास प्रत्येकी रु. २५०

२. **सौ. सुलभा अनंत** प्रायोजित पारितोषिक -

इ. १०वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात **मराठे परिवारांत सर्वाधिक गुणांसाठी** रु. १००

३. **प्रभाकर गणेश** प्रायोजित पारितोषिक -

तांत्रिक विषय घेऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत **मराठे परिवारात सर्वाधिक गुणांसाठी** - रु. ५००

४. **कै. जगन्नाथ दामोदर** शिष्यवृत्ती -

ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.) - वार्षिक रु. २०००

५. **शालिनी धुंडिराज** प्रायोजित **वैदिक शिक्षण अथवा हिंदुधर्माचा प्रचार यांसाठी** - वार्षिक पुरस्कार रु. १०००.

### शैक्षणिक कर्ज

**विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **अर्ज १५ ऑगस्ट २००४ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे.** अर्ज फक्त २००३-०४ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत **अर्जाला जोडून** पाठवावी, नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. खास बक्षिस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

पत्रोत्तर देण्यासाठी **अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.**

### शैक्षणिक, वैद्यकीय मदत

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीहि खास निधीतून (विशिष्ट हेतु निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

***

## लॉकिमचे कॉल सेंटर प्रशिक्षण केंद्र

लॉकिम ही गोदरेजची माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणारी एक महत्वपूर्ण कंपनी. या कंपनीच्या कॉल सेंटर प्रशिक्षण विभागात आपल्या फ्रँचाईजच्या माध्यमातून कॉलसेंटरमध्ये काम करीत असताना आवश्यक संवाद कौशल्य, कार्यकुशलता, तत्परता, शिष्टाचार, कामाचा आवश्यक वेग, समयसूचकता, विविध देशातील उच्चार पद्धती, तिथल्या रहिवाश्यांची मानसिकता यासारख्या अनेक गोष्टींचे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण दिले जाते. अधिक माहितीसाठी ९५२५१-२४४३३४५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# सभासद वृत्त

## मानसन्मान

### डॉ. सुरेंद्रनाथांचे नवे पुस्तक

प्रतिष्ठानचे कार्यकर्ते सभासद **डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ.२८४) यांचे Atoms, Radioactivity and Nuclear Power हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. ते कॉलेज विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकेल. पुस्तकाची किंमत रु. ४० (मराठे प्रतिष्ठानच्या सभासदांसाठी रु. ३५). संपर्क : फोन २५११३८५३.

### दीप्ती मराठे पीएचडी

हितगुजचे संपादक **लक्ष्मण शंकर** (पृ.५२०) यांची मुलगी दीप्ती हिला जानेवारी २००४ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या लाईफ सायन्सेसमध्ये पीएचडी पदवी मिळाली आहे. कॅन्सरवर उपाय म्हणून केमोथेरपी घेताना त्याचे रुग्णावर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासंबंधीच्या संशोधनावर तिचा प्रबंध होता - 'Liposomal Drug Delivery for Enhanced Citotoxicity in Cancer Therapy'. भारत सरकारच्या ॲटॉमिक एनर्जी विभागांतून तिला या संशोधनासाठी ५ वर्षे फेलोशिप मिळत होती. मार्च २००४ पासून नव्या मुंबईतल्या एका औषध कंपनीत सेल कल्चर विभागाची प्रमुख म्हणून दीप्तीची नियुक्ती झाली. मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

### पीएचडी वनक्षेत्रपाल

प्रतिष्ठानचे सभासद चिंतामण चंद्रशेखर (पृ.२४८) यांस "Contributions to the Flora of the Fansad Wild Life Sanctuary" या शोधनिबंधाबद्दल मुंबई विद्यापीठाकडून पीएचडी मिळाली. फणसाड अभयारण्य हे रेवदंडा ते मुरुड (जंजिरा) या रस्त्यावर असून नांदगांव (प्रसिद्ध गणपती) या गांवाजवळ आहे. सध्या श्री. चंद्रशेखर हे पनवेलजवळच्या कर्नाळा पक्षी अभयारण्यांत वनक्षेत्रपाल (फॉरेस्ट ऑफिसर) आहेत.

### विश्वनाथ सीताराम - ~~एमबीबीएस~~ M.D.

गोव्यांतील सभासद **सीताराम यशवंत** (पृ.५२०) **यांचा मुलगा विश्वनाथ** गोवा मेडिकल कॉलेजमधून ~~एमबीबीएस~~ M.D. परीक्षेत मार्च २००४ मध्ये उत्तीर्ण झाला आहे. मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

## नांदा सौख्य भरे

**चिंतामण रा. मराठे** यांची नात (श्री. विवेक मराठे यांची मुलगी) **भूषणा** हिचा विवाह विवेक करमरकर, यांजबरोबर २३ फेब्रुवारी रोजी प्रीति वर्धन मंगल कार्यालय, दापोली येथे थाटाने साजरा झाला. नवविवाहितांचे मराठे कुलबांधवातर्फे अभिनंदन!

### अभिनंदनीय

आम्ही श्री. हेमंत अरुण मराठे व सौ. मृणाल हेमंत मराठे दोघांनी दि. ३०.४.२००४ रोजी माटुंगा येथील श्रद्धानंद महिलाश्रमातून मुलगा दत्तक घेतला आहे. त्याचे नांव 'प्रथम' असे ठेवले आहे. आमची मुलगी कु. प्राची हिच्या संमतीने तिला भाऊ आणला आहे. आम्ही सर्वजण अतिशय आनंदात आहोत.

**- हेमंत अरुण (पृ.२१),**
नालासोपारा, जि. ठाणे.

कु. प्राचीने आपणाला भाऊ हवा अशी इच्छा व्यक्त केली. तिच्या आईबाबांनी एकच अपत्य असावे असे ठरविले होते. मग आता पुन्हा आपण 'चान्स' घेण्यापेक्षा दत्तक मुलगा घेतल्यास एका अनाथ बालकाचे कल्याण होईल अशा उदात्त विचाराने त्यांनी मुलगा दत्तक घ्यायचे ठरविले. निश्चितच अभिनंदनीय! त्यांचा हा विचार अनेकांना प्रेरक ठरावा. - संपादक

## सहवेदना

१. डोंबिवली येथील सभासद **यशवंत उपाख्य सुरेश बाळकृष्ण विद्वांस** (पृ.६२५) ह्यांचे १३ मार्च २००४ रोजी दुःखद निधन झाले. वयाची ६० वर्षे पूर्ण करून ते जुलै २००३ मध्ये युनायटेड वेस्टर्न बँक शाखा डोंबिवली येथून निवृत्त झाले होते. बँकेत ते 'आबा' ह्या आदरणीय लाडक्या नावाने ओळखले जात. ग्राहक, सहकर्मचारी व अधिकारी. ह्यांना ते नेहमीच हसतमुखाने मदत करीत असत. ''आपुलकीने वागणारी माणसं'' ह्या बँकेच्या ब्रीद वाक्याचे ते खरे जागते प्रतीक होते.

२. मराठे प्रतिष्ठानची माहेरवाशीण सभासद **स्मृती भावे (पृ.५२०) यांचे पती मुकुंद विष्णू भावे** यांचे दि. ३०.३.२००४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने अचानक निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय अवघे ४९ होते. ते पुण्यांतील एक लोकप्रिय चार्टर्ड अकौंटट होते. विशेषत: छोटे व्यावसायिक/लघुउद्योजक यांना ते आर्थिक बाबतीत निरलसपणे मार्गदर्शन करीत असत.

३. वेंगुर्ले नगरपरिषदेचे माजी नगरसेवक, कॅम्प-भटवाडी, वेंगुर्ले येथील श्री. सुदेश ऊर्फ **महेश मनोहर** (पृ.११५) यांचे १९ मार्चला सावंतवाडी येथील रुग्णालयात अल्प आजाराने निधन झाले. ते ४४ वर्षांचे होते. एक हरहुन्नरी कार्यकर्ता म्हणून शिवसेनेत त्यांनी काम केले. अनेक रुग्णांना रुग्णालय सेवा, रक्तदान करण्यासाठी त्यांचा पुढाकार असे. त्यांच्या मागे आई-वडील, आजी, पत्नी, दोन मुले, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

४. तुळस-भटवाडी-कुंभारठेव येथील **श्रीमती राधाबाई गोविंद मराठे** (वय ८१) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा, सून, ४ मुली, जामात, नातवंडे असा परिवार आहे.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

### President's Message for 2004

We can achieve our goals -
if we have the
courarage of conviction and
the strength of character
I hope we have both.

**- A. P. J. Abdul Kalam**

# यशस्वी नाट्यव्यावसायिक - बळवंत भास्कर मराठे

- **सीताराम गोपाळ खांबेटे** (पृ.६७६), अंधेरी, मुंबई

मिरजेच्या श्री. बळवंत दत्तात्रेय मराठे यांनी लिहिलेले आपले आजोबा श्री. बळवंत भास्कर मराठे यांचे चरित्र नुकतेच वाचनांत आले. प्रश्न पडला की तीस वर्षे नाटक कंपनी चालविणारा, स्वत: नट असलेला व कित्येक मराठी व हिंदी नाटके लिहिणारा हा कलाकार-नाटककार, विष्णुदास भाव्यांचा समकालीन असूनहि नाट्येतिहास लेखक, नाट्यपरिषद, महाराष्ट्रराज्य सांस्कृतिक कार्यविभाग वा नाट्यअभ्यासक यांच्याकडून उपेक्षित कसा राहिला? त्यांच्यानंतरच्या रंगभूमीवरील नेपथ्यकार, सूत्रधार, नट, लेखक, मालक, यापैकी एखाद्याच भूमिकेत वावरलेल्या व्यक्तींना सुद्धा खूप प्रसिद्धी मिळाली; मग यांच्याच वाट्याला प्रसिद्धीपासून वंचित होण्याचे भोग का यावे? ते पुण्यामुंबईचे रहिवासी नव्हते म्हणून? की त्यांच्या दौऱ्यातील बराच काळ महाराष्ट्राबाहेर गेला म्हणून?

मराठी प्रमाणेच त्यांनी हिंदी रंगभूमीही गाजविली. त्यांनी ३८ मराठी व हिंदी नाटके लिहिली. भारतभ्रमण करून जवळजवळ ३२ लहानमोठ्या गांवी आपले प्रयोग सादर केले. त्यांच्या मराठी नाटकांपैकी संगीत सारंगधर हे एकमेव प्रकाशित नाटक उपलब्ध आहे. (प्रकाशन वर्ष - सन १८८६; मूल्य ४ आणे). तसेच संगीत सौभद्र च्या हिंदी आवृत्तीचे हस्तलिखितहि सापडले आहे. ते कदाचित हिंदी भाषेतील आद्य संगीत नाटक असेल काय हा संशोधनाचा विषय होऊ शकेल.

१८८० ते १९१० हा त्यांचा ऐन उमेदीचा काळ. या काळात नाटक कंपनी एकदा दौऱ्यावर निघाली ती तीन साडेतीन वर्षांनी परतत असे. त्यानंतर एक वर्ष विश्रांती घेऊन परत साडेतीन वर्षांचा दौरा अशी कार्यक्रमाची आखणी असे, नूतन सांगलीकर हिंदू (हिंदी) नाटक मंडळी हे त्यांच्या नाट्यसंस्थेचे नांव.

त्याकाळी प्रचलित असलेल्या व्यवस्थापन पद्धतीपेक्षा त्यांचे व्यवस्थापन वेगळे होते. इतर नाटक कंपन्या आठवड्यातून दोन तीन नाटके करीत तर यांची मंडळी दररोज नवे नाटक सादर करून ४०-४५ दिवसांनी पुढच्या मुक्कामी दाखल होई. कंपनीबरोबर दौऱ्यावर येणारे नट व इतर गडीमाणसे आपल्यासमवेत तीन साडेतीन वर्षे राहणार असल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाची सोयही करण्यात येई.

कंपनीतील सर्वांनाच जवळजवळ ४५-५० जणांना आणेवारीने (म्हणजे सर्व खर्च वजा जाता उरलेल्या पैशातून) रक्कम मिळत असे. त्यामुळे सर्वांची आपण कंपनीचे मालक आहोत ही धारणा असे. मासिक पगार वाटपाची रक्कम ६ हजारावर जात असे. सर्व नट व अन्य मंडळींचा जेवण व कपडालत्ता खर्च कंपनी करीत असे. त्याखेरीज जाण्यायेण्याच्या भाड्याचे पैसे ठेवून बाकी सर्व पैसे हरिपूरला लागूंच्या पेढीवर नियमितपणे पाठविले जात. दौऱ्यावरुन गावी परत आल्यावर ह्या सर्व पैशाचा हिशेब होऊन वाटण्या होत असत.

कर्जबाजारी होऊन दिवाळे काढणे किंवा कंपनी बंद करणे हे विधिलिखित त्या काळातील बऱ्याच नाटकमंडळींच्या नशिबी असताना चोख व्यवस्थापन, शिस्त, निर्व्यसनीपणा व दूरदर्शित्व या अंगच्या गुणांमुळे बळवंतरावानी सतत ३० वर्षे नाट्यव्यवसाय फायदेशीर केला आणि वयाच्या ६७व्या वर्षी, १९१२ साली, हरिपूर (सांगली) येथे कंपनीतील सर्वांना हातात सोन्याचे कडे घालून कृतकृत्यतेने निरोप देऊन कंपनी विसर्जित केली.

आतवट्याचा म्हणून कुख्यात असलेल्या नाट्यव्यवसायातून मिळालेल्या पैशातून १८६९

*(पुढे पृ.७ वर....)*

---

# राधाबाई परांजपे यांचे आत्मकथन -अंतरींची हांक

- **सौ. सुमेधा प्रभाकर**, वडाळा, मुंबई

मराठे कुळांतील **कर्तृत्ववान माहेरवाशीण श्रीमती राधाबाई परांजपे** यांचे प्रामाणिक आत्मकथन 'अंतरीची हाक' प्रसिद्ध झाले आहे. रायगड जिल्ह्यांतील आवास गावी राहणाऱ्या श्रीमती राधाबाई परांजपे या समाजसेविकेने लिहिलेले हे अनुभव कथन. तिने केलेल्या सामाजिक कार्याचे विविध आविष्कार यामधे दिसतात. (प्रकाशक प्राचार्य केशव परांजपे, अे-१ नवोदित को. हौ. सो., छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.)

कोकणातील हरकूळ गांवच्या **वासुदेव नारायण (पृ.४३८) या आयुर्वेद विशारद दशग्रंथी ब्राह्मणाची ही मुलगी - द्वारकी.** १६व्या वर्षी लग्न होऊन द्वारकी झाली राधाबाई परांजपे. त्यांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्याच. त्याचबरोबर बालवाडी चालवण्यापासून ग्रामीण भागातील अशिक्षित, अडाणी माणसांमधे आरोग्यसेविका म्हणून त्यांच्या सुखदु:खात समरस झाल्या. पतीची आणि मुलांचीहि साथ लाभल्यामुळे त्या समाजकार्यात झोकून देऊन काम करू शकल्या. भाताच्या पिकापासून तयार होणाऱ्या निरनिराळ्या १०८ पदार्थांचे प्रदर्शन भरवणे, इच्छुक वधुवरांचे आंतरजातीय विवाह करून देणे, कुटुंबनियोजनाचा प्रचार, भेदभाव न पाळता, जातिभेद न मानता व्रतवैकल्ये कशी करावी त्याचा वस्तुपाठ घालून दिला. विधवा स्त्रीने पुनर्विवाह केला, तिला सवाष्ण म्हणून मंगळागौरीला बोलावले. राष्ट्रीय महापुरुषांच्या कार्याची महती समाजांत रुजवणे, वृद्धिंगत करणे, समर्थांची त्रिशताब्दि, विवेकानंद जयंती, स्वा. सावरकरांची जन्मशताब्दि असे अनेक कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे राबवले.

राधाबाई जुलैमध्ये ८३ वर्षांच्या होतील. त्यानिमित्त त्यांचे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन आणि 'जीवेत शरद: शतम्' अशा शुभेच्छा! ***

*स्वयंरोजगार....(पृ. १ वरून)*

उत्पादित माल घाऊक प्रमाणात घेऊन किरकोळ भावात विक्री करणे हे **व्यापाराचे स्वरूप** असते. मुंबईत रस्त्याच्या दुतर्फा असलेली असंख्य दुकाने पाहिली म्हणजे व्यापाराच्या विविधतेची कल्पना येते.

लघुउद्योगात **'सेवा उद्योग'** हा प्रकार असा आहे की तो अल्पभांडवलात किंवा काही बाबतीत मुळीच भांडवल न घालताही करता येतो. आपल्याकडे असणारे कसब म्हणजेच सेवा उद्योगाचे भांडवल म्हणता येईल. नीट डोळे उघडे ठेवून आपल्या आजूबाजूला पाहिले तर असे अनेक सेवा उद्योग व ते करणारे लोक दिसून येतात.

**दुरुस्ती व्यवसाय** - एखाद्याने रेडिओ, टीव्ही दुरुस्तीचे किंवा वॉशिंग मशीन, रिफ्रिजरेटर, एअर कण्डीशनर यांच्या दुरुस्तीचे तंत्रशिक्षण घेऊन त्यातील कसब आत्मसात केले की हातात 'टूल किट' घेऊन घरोघरी जाऊन दुरुस्तीचा व्यवसाय सुरू केला की तोही एक सेवा उद्योग.

**ब्युटीपार्लर** - ब्युटीशिअनचा कोर्स करून त्यात प्राविण्य मिळवून एखादी महिला घरातल्या घरात छोटे ब्युटी पार्लर चालवू शकेल किंवा लग्नसमारंभात जाऊन वधूला नटविण्याचा उद्योग करता येईल. स्वत: ब्युटीशियनचा वर्ग सुरू करूनहि अर्थार्जन करू शकेल.

वरील दोन्ही सेवा उद्योग शारीरिक कसबाचा वापर करून सुरू केले जातात.

**कन्सलटन्सी व्यवसाय** - बौद्धिक कसबावर आधारलेले सेवा उद्योग म्हणजे कन्सल्टन्सी व्यवसाय, टॅक्स कन्सल्टंट, मॅनेजमेंट कन्सल्टंट असे अनेक कन्सल्टन्सी व्यवसाय सेवा उद्योगात येतात. त्या त्या विषयाचे प्रशिक्षण किंवा त्या त्या क्षेत्रातील कामाचा अनुभव घेऊन स्वतंत्रपणे हा व्यवसाय करता येईल.

**गुंतवणूक व्यवसाय** - आज सर्वच थरातील लोकांमध्ये भावी काळासाठी बचत करण्याची वृत्ती वाढीला लागली आहे. अनेक बचत योजनांची वृत्तपत्रातून टीव्हीवरून जाहिरातही केली जाते. एल. आय. सी., युनिट ट्रस्ट, नॅशनल सेव्हींग स्कीम, एच. डी. एफ. सी. या सरकारी यंत्रणेच्या बचत योजनेत अगर खाजगी औद्योगिक कंपन्यांच्या मुदत ठेवीमध्ये लोक पैसे गुंतवीत असतात. आणि कंपन्याही या गुंतवणुकीसाठी एजन्ट नेमीत असतात.

कन्सल्टन्सी व्यवसाय किंवा गुंतवणूक व्यवसाय या दोन्ही ठिकाणी आपल्या बुद्धीचे कसबच पणाला लागत असते. या कसबाच्या जोरावरच पहिल्या व्यवसायात आपण गिऱ्हाईकाला अचूक सल्ला देतो तर दुसऱ्या व्यवसायात गिऱ्हाईकांना पटवतो. पहिल्यात आपणास गिऱ्हाईकाकडूनच फी मिळते तर दुसऱ्यात विविध यंत्रणाकडून कमिशन मिळते.

**लग्नसमारंभातील विविध व्यवसाय** - आपल्या समाजात ज्या हौसेने आपले विवाह समारंभ साजरे करतो त्याकडे बारकाईने पाहिले तर केटरिंग व्यवसाय, फोटोग्राफीचा व्यवसाय, वधूला नटविण्याचा व्यवसाय, मेहंदी लावण्याचा व्यवसाय असे अनेक सेवा उद्योग उपलब्ध होऊ शकतात. हे व्यवसाय करण्याची आवड असली तर त्या त्या प्रस्थापित व्यावसायिकाकडे काही दिवस उमेदवारी करुन धंद्याचे तंत्र आत्मसात करता येईल आणि काही दिवसांनी स्वत:च व्यवसाय सुरु करता येईल.

**ट्रॅव्हल व टुरिझमच्या** क्षेत्रात रेल्वे, बसगाड्या, विमाने यांचे आरक्षण करून देण्याचा व्यवसाय हाही एक बिनभांडवली सेवा उद्योग आहे. आपणास बोलण्याची व सांगण्याची कला अवगत असेल तर **'टुरिस्ट गाइड'** सारखा व्यवसायही करता येईल. एखाद्या ट्रॅव्हल एजन्सीमध्ये उमेदवारी करून या व्यवसायाची माहिती करून घेता येईल.

मुंबईत लहानशा जागेत अनेक सोयी करून घ्याव्या लागतात. त्या आकर्षक पद्धतीने कशा कराव्यात हे शिकविणारे शास्त्र म्हणजे **गृहसजावट (इंटिरिअर डेकोरेशन)**. यांचे अल्पमुदतीचे प्रशिक्षण घेऊन हा व्यवसाय सुरू करता येईल. त्याला आज मागणीही आहे.

**'कुरीअर सर्व्हिस'** हा असाच एक बिनभांडवली सेवा उद्योग आहे. हा व्यवसाय कोणीही करू शकेल.

उद्योग करण्याची जिद्ध बाळगणाऱ्याला अनेक सेवा उद्योग आहेत. मुंबईतच याहूनही छोटे उद्योग करून अर्थार्जन करणारे लोक आहेत. त्यापैकी काही असे - १) तुमच्या घरचा किंवा मोठ्या ऑफिसातील फोन साफसूफ करून देणे २) तुमच्या घरच्या भिंतीवरील चित्रे दर महिन्याला बदलणे ३) फिरते ग्रंथालय चालवणे ४) ऑफिसमध्ये जाणाऱ्या लोकांना भाजी-पोळीचे डबे पुरविणे ५) तुमचा रेल्वे पास ठराविक तारखेला नवीन बदलून आणणे ६) तुमची बँकेची कामे, टेलिफोन-इलेक्ट्रीसिटीचे बील भरणा करणे इ. अनेक व्यवसाय आहेत.

**सेवा उद्योगातून लघुउद्योगाकडे** - स्वयंरोजगाराची पहिली पायरी सेवा उद्योग, दुसरी पायरी व्यापार व तिसरी उत्पादन व्यवसाय. सेवा उद्योग किंवा व्यापार साधला की तुम्हाला आपण लोकांना कितपत पटवू शकतो याचा अंदाज येतो व आत्मविश्वास वाढतो. विक्री करण्याचे तंत्र एकदा साध्य झाले की उत्पादन करणारा लघुउद्योग सुलभपणे करता येईल.

शेवटी स्वयंरोजगाराचे किंवा लघुउद्योगाचे एक तत्त्व आहे. Find the need and fill it. समाजाची गरज शोधा व ती भागविण्याचा उद्योग सुरू करा.

(साभार : सारस्वत चैतन्य) ✱✱✱

*ती. मातोश्री मंदाकिनी दामोदर*

**यांच्या स्मरणार्थ**

**- श्री. प्रभाकर दामोदर मराठे,**
वडाळा, मुंबई.

# ओढ हिमालयाची

- **विंग कमांडर (नि) यशवन्त लक्ष्मण** (पृ.१०१), पुणे.

आपल्याच देशाच्या एका विस्तीर्ण प्रदेशाबद्दल आपल्यापेक्षा परदेशीयांना जास्त माहिती आहे हे विधान अविश्वसनीय वाटते. पण सत्य आहे. जम्मू काश्मीरचा लढाक हा एक सर्वात मोठा प्रांत आहे. तेथली संस्कृती व नैसर्गिक जडण घडण इतकी बेजोड आहे की त्याचे आकर्षण परदेशी पर्यटकांनाच जास्त आहे. मनाली जवळचा रोहतांग पास (१३५०० फूट), व त्यानंतर बारलाचा (१४५०० फूट), तागलुंगला (१७६०० फूट) व शेवटी खाडुंगला (१८३०० फूट). युरोपातल्या आल्प्स्‌ची उंची १४५०० फुटापेक्षा जास्त नाही. हा ४५० कि.मी. चा जगात सर्वात उंच. खडतर, आश्चर्यचकीत करणारा मोटर वाहनांचा रस्ता आहे.

आठ महिने बर्फाच्छादित असणाऱ्या या प्रदेशातून चंद्रभागा, सिंधू, जस्कर नद्यांची खोरी आहेत. बर्फ वितळला की जुलै ते ऑक्टोबर या काळात या नद्यांच्या खोऱ्यांत शेती होऊ शकते. बाकी ८०% भूभाग हा अति थंड, कोरडा, ओसाड व वाळवंटी आहे. या भागात पाऊस पडत नाही. पडलेले बर्फ ८ महिने राहते आणि साधारण १५००० फुटावरची शिखरे बर्फाच्छादितच रहातात. बर्फ आणि वाऱ्यामुळे या मातीमय पर्वतांची झीज सतत होते. त्यामुळे कोठे अणकुचीदार, कोठे असंख्य देवळांच्या घुमटाचे, कोठे लेण्यासारखे दिसणारे तर कोठे गुळगुळीत थरावर थर असलेले आकार निसर्ग प्रेमी आणि फोटोग्राफर्सना मोहिनी घालणारे ठरतात.

मी माझ्या सहा मित्रांबरोबर ही सफर २७ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २००३ या काळात केली. १४-१५ हजार फूट उंची वर कमी दाब, कमी प्राणवायू यामुळे डोकेदुखी, उलट्या, भोवळ, भूक जाणे व गुदमरल्यासारखं वाटणे हे प्रकार होऊ शकतात. याची कल्पना असूनही आम्ही मनाचा निर्धार करुन निर्णय घेतला होता. आमच्यात सर्वात लहान ६५ व मी. ७२! यापूर्वी हिमालयात दोन वेळा मी १५,५०० फुटापर्यंत ट्रेकिंग केलं होतं आणि कोठल्याही दिवशी मी १०० कि.मी. सायकलिंग करू शकतो. हा अनुभव निर्णय घ्यायला पुरेसा होता.

आम्ही जम्मू मार्गे विमानान लेहला पोहोचलो. या उंचीवर सरावासाठी २ दिवस विश्रांती घ्यावी लागते. त्या वेळात लेहला लढाक उत्सव पाहिला. रंगीबेरंगी पोषाखातील स्त्री पुरुष घोडे, याक व दोन उंचवटे पाठीवर असणारे केसाळ उंट, पाश्मीना शेळ्या मिरवणुकीत सामील झाले होते. हे लोक आपल्या खास झांजा व पिपाण्यांच्या लयाबरोबर नृत्यही करीत होते. ७-८ शे वर्षापूर्वीचा स्टोक राजाचा राजवाडा गावाबाहेर डोंगरावर दिसत होता.

दुसऱ्या दिवशी हेमीस गोंपा थिकसे, आणि शे मोनॅस्ट्रीज बघितल्या. थिकसेय्या पाच मजली वास्तूत तीन मजले प्रसिद्ध सोनेरी सुशोभित बौद्ध मूर्तीने व्यापले आहेत. ही सर्व ठिकाणे सिंधु खोऱ्याजवळ असल्यामुळे निसर्गरम्य वाटतात. त्याच दिवशी कारगील रस्त्यावर उभारलेला ''वीर सन्मान'' म्युझियम, जस्कार आणि सिंधू नदीचा संगम आणि चुंबकीय टेकडी ही ठिकाणे बघितली. या टेकडीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे उतारावर वाहन थांबवले तर ते खाली न घसरता गुरूत्वाकर्षणाविरुद्ध ८-१० फूट उलट वर सरकते. तसा सरकारी फलकही लावलेला आहे.

तिसऱ्या दिवशी ८५ कि.मी. वर असलेल्या खारदुंगला येथे जीपने गेलो. उंची १८५०० फूट, तिघांना डोकेदुखीचा त्रास जाणवला. येथे खूप बर्फ होतं. काही ब्रिटिश पर्यटकांनी ट्रकमध्ये सायकली आणल्या होत्या आणि ते ८५ कि.मी. परतीचा प्रवास सायकलवर करणार होते. काही जर्मन पर्यटक तर सायकलनेच वरपर्यंत येत होते. हे खरे

# यशस्वी उद्योजक मनोहर महंते

**प्रेषक : हेमंत अरुण** (पृ.२१), नालासोपारा, जि. ठाणे

***त्यांनी उभारलेली सोना इलेक्ट्रिक काय, किंवा एल्मेको काय हे दोन्ही वडिलोपार्जित कारखाने नव्हते. ते पहिल्या पिढीचे उद्योजक आहेत. आपल्या विकासासाठी गांव सोडले पाहिजे या समजुतीस छेद देणारे मनोहर महंते यांचे हे यश केव्हाही कौतुकाचे नाही का?***

मनोहर कमळाकर महंते. जन्मले वाढले... स्थिरावले ते ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यात म्हणजे पश्चिम रेल्वेचे मुंबई जवळचे स्टेशन... आई लहानपणीच देवाघरी गेल्याने त्यांना आजीकडे रहावे लागले. आजीसोबत त्यांनी मच्छी, भाजीपाला विकत मॅट्रिकचा पडावा पूर्ण केला. **मुंबईत काम करीत डायमेकिंगचे शिक्षण घेतले. गोदरेज, बडोद्याची ज्योती लि. अशा कंपन्यातून नोकरी केली नी ग्रामोदय व्हावा या दिशेने पालघरच्या केळवे रोड येथे स्वत:चा उद्योग उभारला.** ते अंत:करणाने उद्योजक आणि शेतकरी, कामकरी आहेत. अजून वयाची पन्नाशी पूर्ण व्हायची आहे. आपल्या जन्मगावी कारखानदारीचे स्वप्न पाहिल आणि परिसरातील खेडूत तरुण-तरुणींना सोबत घेऊन कुंभाराने मडकी घडवावीत तशी त्यांना कामात तरबेज करून आपल्या सोना इलेक्ट्रिकल्स कंपनी चालविली.

पुढे स्वत:चे उत्पादन हवे म्हणून विविध प्रकारचे इलेक्ट्रिक स्वीच बनविणारी एल्मको इंडिया ही कंपनी उभारली. देशातील प्रमुख नऊ शहरांतून त्यांचे उत्पादन जाऊ लागले. एवढचे नव्हे तर शेजारच्या देशात श्रीलंका व अरब देशातूनही यांच्या उत्पादनाला मागणी येत गेली. जोडीला फळबाग उभारून आंबा, चिकू, पेरू, डाळींब, नारळ अशी फळांची जोपासनाही केली.

***

साहस! आमच्या हॉटेलमध्ये बाकी सर्व परदेशी पर्यटक ट्रेकिंग करणारे होते. निघण्यापूर्वी आम्ही लढाक शांतीचा जपान सरकारने बांधलेला स्तूप बघितला. खूप उंचीवर हा स्तूप असल्यामुळे सर्व लेह शहराचे मनोहर विहंगम दृश्य तेथून दिसते.

परतीचा ४५० कि.मी. चा प्रवास सुरवातीला सांगितलेल्या खडतर रस्त्यावरून क्वालीस जीपने दोन टप्प्यात करणार होतो. पंग, भरतपूर, सरचू वगैरे ठिकाणी सिझनमध्ये तंबूत रहायची सोय असते. रात्री सोसाट्याचा वारा आणि शून्याजवळ तापमान असले तरी तंबूत कॉट, स्लिपींग बॅग वरदान ठरतात. नाही तर या ४५० कि.मी. च्या रस्त्यावर अजिबात वस्ती नाही. कोठे चुन्यासारखे पांढरे, पिवळे, तपकिरी, काळे, हिरवट किंवा निळसर पर्वत व त्यातले विविध आकार पाहताना वेळ मात्र जाणवत नाही. क्वचित ठिकाणी शेळ्या आणि पाच सहा थंड प्रदेशातली काळवीट हरणे दिसली. कोठली ना कोठली खोल खोल डोंगर कापत जाणारी नदी बरोबर असते.

जगातील सर्वात उंच अशा रस्त्यावरून आपला प्रवास होत आहे याची जाणीवही हिम शिखराजवळून जाताना होते. ही अभूतपूर्व दृश्ये साठवून ठेवण्याचा आपण प्रयत्न करतो आणि ''परत केव्हा?'' हा प्रश्न मनात वारंवार येऊ लागतो. पुढल्या वेळी ट्रेकिंगसाठी येथे येता यावं ही इच्छा धरून मी या प्रवासाची सांगता केली.

***

---

# सुखी जीवनाचा मूलमंत्र

**- सौ. विद्या सुनिल चक्रदेव** (पृ.७३३), मुलुंड, मुंबई

आशा निराशेचा हिंदोळा म्हणजेच जीवन. अशी जीवनाची व्याख्या जरी विचारवंतांनी केली असली तरी देखील हे जीवन सर्वांगसुंदरच आहे! फक्त त्यासाठी माणसाचा जीवनकडे पाहाण्याचा दृष्टिकोन सकरात्मक असला पाहिजे. जगण्याची उमेद अधिकाधिक वाढण्यासाठी दररोज अनुभवास येणारे नित्य-नवे क्षण, आनंदीपणा, समाधानी वृत्ती, कष्ट करण्याची तयारी हे गुण आत्मसात करावे लागतील. लहानपणापासून आपली कामे आपण स्वत:च करण्याची सवय लावून घेतली तर वृद्धपणी येणारे परावलंबित्व टाळता येईल.

बाह्य वातावरणाचा नकळतपणे आपल्या शरीरावर परिणाम होत असतो. तसेच आपल्या मनातील चांगल्या-वाईट विचारांचाही परिणाम, शरीरातील प्रत्येक पेशींवर होत असतो. शुद्ध आणि सात्विक आहारासोबतच मनाचं स्वास्थ्यही राखले पाहिजे. मन जर सतत कुठल्यातरी चिंतेत व्यग्र राहिले तर ते जीवनातील आनंद कधीच घेऊ शकणार नाही. म्हणूनच मन आनंदी, उत्साही असावे. जेणेकरून उगवलेला प्रत्येक दिवस चैतन्यमय होईल.

'आत्मभान' हे केव्हाही चांगलंच! बालपणापासून ते तारूण्याचा दशेपर्यंतच्या प्रवासात अनेक घटना, प्रसंग व अनुभवाने आपले शरीर व मन पूर्ण तयार झालेले असते त्यानुसारच आपले आचार, विचार, इच्छा, भावना, महत्वाकांक्षा इ. गोष्टी आपल्या कृतीतून व्यक्त होत असतात. जे नाही त्याची खंत न बाळगता, जे मुळात आपल्यापाशी आहे ते जाणून प्रत्येक क्षणाचा सदुपयोग आपले व्यक्तिमत्त्व बहरण्यात सार्थकी लावावा.

लोक काय'म्हणतील? यापेक्षा आपल्याला काय आवडतं ते पाहावं. सर्वप्रथम स्वत:वर विश्वास ठेवणं जास्त महत्त्वाचं आहे. जीवन सर्वांगाने जगावं. नेहमी काहीतरी नवीन करण्याची वृत्ती ठेवावी. जगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन आनंदी ठेवल्यास आपले आयुष्य जास्त वाढतं. संशयी वृत्तीने जगाकडे पाहिल्यास मन दु:खीकष्टी होते. परोपकाराची सवय असावी. कोणाचं काही चुकलं तर क्षमा करण्याची तयारी ठेवावी.

जेव्हा जेव्हा आपले मन उदास होईल, तेव्हा लाहन मुलांकडे पाहावं. त्यांच्याकडे उत्साहाचा प्रचंड झराच असतो. आपले बालपणीचे दिवस आठवावे किंवा फुलांनी डवरलेला वृक्ष बघावा, जेणेकरुन आपले मन पुन्हा ताजेतवाने होईल. जीवनात घडणाऱ्या ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्याबद्दल विचार करत दु:खी होऊ नये. प्रत्येक समस्येवर काळ सुंदर औषध आहे. भूतकाळातील गोष्टी आठवण्यात व्यर्थ वेळ घालवू नये आणि भविष्यातील गोष्टींचा तरी विचार का करावा?

उगवलेला प्रत्येक दिवस आपल्या आयुष्यात हा पहिलाच आणि शेवटचा आहे, हा विचार लक्षात ठेवून त्याप्रमाणे आचरण ठेवले तर प्रत्येकाचे जीवन निश्चितपणे सुखी होईल यात शंकाच नाही आणि यातच या लेखनाचे उद्दिष्ट सफल होईल.

***

---

*आद्य नाट्यव्यावसायिक....* *(पृ. ४ वरून)*

सालीच केंपवाड (मिरजेहून ३५ किमी) येथे ३० एकर जमीन विकत घेऊन तेथेच राहाण्यासाठी दुमजली वास्तु बांधली.

हा ग्रंथ संपन्न करण्यासाठी **बळवंत दत्तात्रय** (पृ.८२) यांनी खूपच परिश्रम घेतले आहेत. त्यांच्या या जिद्दीबद्दल ते नक्कीच कौतुकास पात्र आहेत. एका अप्रसिद्ध रंगकर्मीचे चरित्र लिहून त्यांनी रंगभूमीची महान सेवा केली आहे. याचे प्रकाशन नुकतेच नाट्यसंमेलनाध्यक्ष श्री. शं. ना. नवरे यांच्या शुभहस्ते पुणे येथे संपन्न झाले. (रंगसारंग बळवंत भास्कर मराठे जीवन व कार्य व सोबत संपूर्ण संगीत सारंगधर नाटक, प्रकाशक सुहास बळवंत मराठे, मराठे वाडा, डॉ. भडभडे मार्ग, ब्राह्मणपुरी, मिरज, पाने २२४, किंमत रु. १५०).

माझ्या माहितीप्रमाणे नाट्यसंशोधक कै. के. टी. देशमुख यांनी मध्यप्रदेश सरकारने दिलेल्या अनुदानातून मध्यप्रदेशातील रंगभूमीचा शोध घेतला होता. त्याचा अहवाल मध्यप्रदेश सरकार दप्तरात निश्चितच असेल. बळवंत दत्तात्रय यांनी याबद्दल काही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला होता काय?

***

# कारागृह निष्ठा!

**- अच्युत महादेव चक्रदेव** (पृ.७३२), निवृत्त कारागृह निरीक्षक, पुणे

सत्याग्रहींचे मोर्चे कारागृहांत दाखल होत होते. प्रवेश देण्याचे काम सुरू होते. सत्याग्रहींच्या हातातील घड्याळे, अंगठ्या, अन्य मौल्यवान वस्तू एका पाकीटात बंद करुन त्याला सील करण्याचेही काम एका बाजूस चालू होते. तसा मी त्या कारागृहांत नवीनच होतो.

या सगळ्या व्यापांत मला एकच गोष्ट खटकत होती आणि ती म्हणजे तेथे एका बाजूस एका कोपऱ्यांत एक बंदी उभा होता. आपल्या परीने तो काहीबाही मदत करीत होता. मला न राहवून मी वरिष्ठांकडे गेलो आणि मला खटकत असणाऱ्या ह्या कैद्याला तेथे ठेवणे सयुक्तिक नाही इ. सांगू लागलो.

पण ते चक्क हसले आणि म्हणाले, 'तो तेथेच राहील.' माझा नाईलाज होता. यथावकाश सत्याग्रही प्रवेशाचे काम संपले. दागिने पाकिटे सीलबंद होऊन तिजोरीमध्ये ठेवली गेली.

नंतर २-४ दिवसांनी पुन्हा मला तो बंदी दिसला. तो खूपच घाईत होता. मी त्याला हाक मारली. तो म्हणाला 'माझ्या हातातले काम संपवून मी येतोच.' १५ मिनिटांत तो आला. मी काय विचारणार ते बहुधा त्याला माहीत असावे. तो सांगू लागला. 'साहेब, मी लहान होतो. माझ्या वडिलांचा मोठा व्यापार होता. माझे चुलते, चुलत भाऊ सर्वचजण त्या व्यवसायांत होते. अचानक माझ्या वडिलांचे दुर्दैवाने निधन झाले. पुढे काही दिवस त्यांनी मला व माझे आईला सांभाळले. माझ्याकडून वाटेत ती हलकी कामे करून घेऊ लागले. वडिलांनी केलेले उपकार ते पूर्णपणे विसरले. अगदी आवश्यक तेवढी रक्कमही ते द्यायला आढेवेढे घेत. जेमतेम ९वी पर्यंत माझे शिक्षण झाले. एकदा त्यांच्या सहीसारखीच सही करायला शिकलो आणि चेकबुक हस्तगत करुन काही चेक वटवले.

यथावकाश पोलीस प्रकरण झाले आणि मला शिक्षा लागली. पुढे माझा हा व्यवसायच झाला. चेक वटवायचे. मिळालेले पैसे आईला खर्चायला द्यायचे आणि उरलेल्या पैशांवर चैन करायची, प्रवास करायचा, पैसे संपवायचे. मध्येच पकडला गेलो तर जेलमध्ये यायचं'.... गेली २५ वर्षे हेच चालू आहे. बाहेरच्या जगामधल्या लोकांनी, नातेवाईकांनी मला खूप त्रास दिलाय साहेब, अगदी लहानपणापासून.

पण कारागृहात मात्र मला अतिशय चांगली वागणूक मिळाली. माझ्यावर विश्वास ठेवला गेला. जे मला घरांत मिळाले नाही ते मला कारागृहाने दिले. शिक्षण दिले. साहेब, खऱ्या अर्थाने कारागृह हे माझे घर आहे. आपल्या घरांतल्या माणसांना आपण फसवत नाही. तसंच मी माझ्या कारागृहांतल्या वास्तव्यांत कोणाचीही फसवणूक करीत नाही. भरपूर कष्ट करतो. अधिकाऱ्यांना, बंदी बांधवांना मदत करतो. कारागृहांत जरी माझ्यासमोर पैशांच्या राशी पडल्या तरी तिकडे मी ढुंकूनही पहाणार नाही.

आणि हेच अधिकाऱ्यांना ठाऊक आहे. ते माझ्यावर पूर्ण विश्वास टाकतात. गेल्या २५ वर्षात या विश्वासाला मी तडा जावू दिला नाही. कारणे हे माझं घर आहे. साहेब, आता मात्र मी चांगला राहून, वागून माझ्या आईला सांभाळणार आहे. वेडावाकडा वागणार नाही. तेवढंच तिला समाधान वाटेल.

घर समजून वागणाऱ्या शिवरामकडे पाहून आणि त्याचे जीवनाविषयक तत्वज्ञान ऐकून मला अतिशय आश्चर्य वाटले आणि माझ्या वरिष्ठांनी 'तो तेथेच राहील' या काढलेल्या उद्गारांचे आपोआप उत्तर मिळाले. ***

# स्वयंरोजगारासाठी सहाय्य योजना

**प्रेषक - हेमंत अरुण** (पृ.२१), नालासोपारा, जि. ठाणे

रोजगार आणि स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत रोजगार कार्यक्रम, जवाहर ग्रामसमृद्धी योजना, आश्वासित रोजगार योजना, स्वर्ण जयंती ग्रामस्वराज योजना, संपूर्ण ग्रामीण स्वराज्य योजना राबविल्या जातात. या योजना प्रत्येक जिल्ह्यात असणाऱ्या जिल्हा उद्योग केंद्राद्वारे राबविल्या जातात. प्रत्येक जिल्ह्यात रोजगार स्वयंरोजगार कार्यालय उघडण्यात आले आहे. या ठिकाणीही योजनांची माहिती मिळू शकते. शासनाने विविध आर्थिक विकास महामंडळे स्थापन केली आहेत. या महामंडळांचीही कार्यालये जिल्ह्याच्या मुख्यालयांत असतात. या महामंडळातर्फे रोजगार स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते तसेच अनुदानही दिले जातात.

रोजगार, स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी उपयुक्त ठरलेली एक महत्त्वाची योजना म्हणजे पंतप्रधान रोजगार योजना. या योजनेंतर्गत दरवर्षी किती बेरोजगारांना कर्ज द्यायचे याचे उद्दिष्ट केंद्र सरकारतर्फेच निर्धारित करण्यात येते. या योजनेच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण स्वत: जिल्हाधिकारी करतात. ***

# सागराला गवसणी घालणारी गलेलठ्ठ पगाराची नोकरी

हल्ली क्रूज सफारींचे फॅड निघाले आहे. क्रूज म्हणजे समुद्रावर तरंगणारी आलिशान फाईव्हस्टार हॉटेल्सच. क्रूजवर कामासाठी शेकडो माणसे लागतात. समुद्रावरचा हा जॉब चांगला गलेलठ्ठ पगाराचा असतो. या क्षेत्राची माहिती इतरांना व्हावी, विशेषत: महाराष्ट्रीयन तरूण या क्षेत्राकडे वळावे यासाठी २२ वर्षे सागरावर काढलेल्या कॅप्टन एन. के. बसाक यांनी नवी मुंबईत वाशी येथे एसएनएस मरीन इन्स्टिट्यूट सुरू केली. येथे विविध प्रकारचे अभ्यासक्रम शिकवले जातात. संपर्क - एसएनएस मरीन इन्स्टिट्यूट, सी-३००, १ला मजला, वाशी प्लाजा, सेक्टर १७, वाशी-नवी मुंबई (दूरध्वनी : २७६५७८३१/२७६५७८६५). ***

# विवाह सहाय्य

*हितगजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक*

**सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), म. प्र. वधूवर सूचक मंडळ, पुणे यांचेमार्फत आलेली स्थळे २०/२००४ ते ४२/२००४.**

**क्र. २०/२००४ वर** - स्वानंद शरदचंद्र बुद्धिसागर, देशस्थ ब्राह्मण, जन्म - ६.९.१९७१, उंची - ६'-१'', गोरा वर्ण, मध्यम बांधा, व्यंग नाही, B. E. Electrical व MBA, नोकरी - मॅक्स न्यूयॉर्क लाईफ इन्शुरन्स कंपनीत असोसिएट पार्टनर, मा. प्रा. रु. ४०,०००, घरी आई वडील व एक मोठी विवाहित बहीण मुंबईला. **संपर्क** - शरदचंद्र गजानन बुद्धिसागर, १० स्वप्ननगरी अपार्टमेंट, गणंजय सोसायटी, कोथरूड, पुणे ३८. फोन : २५२८१४०९.

**क्र. २१/२००४ वर** - राजेंद्र दिलीप बोकील, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणस गोत्र - जमदग्नि वत्स, जन्म - ३१.३.१९८०, उंची - ५'-६'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, रक्तगट - B+ve, व्यंग नाही, चष्मा आहे, B. E. Electrical, मोबाईलचा व्यवसाय, मा. प्रा. रु. १०,०००, घरी आई वडील, एक धाकटा भाऊ व आजोबा, गाण्याची आवड व अभिनय उत्तम, **अपेक्षा** - कोणत्याही शाखेची द्विपदवीधर नोकरी करणारी व कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची, उंची - ५'' पेक्षा जास्त. **संपर्क** - दिलीप सदाशिव बोकील, ८५ कसबा पेठ, बोर्लीकर बिल्डींग, तांबट हौदाजवळ, पुणे - ४०० ०११. फोन : ४४६०५७६. संध्याकाळी ६ नंतर संपर्क साधणे.

**क्र. २२/२००४ वर** - योगेश दत्तात्रय देशपांडे, ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र - वशिष्ठ, जन्म - ३१.३.१९७८, उंची - ५'-६'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, रक्तगट O+ve, व्यंग नाही, B.Com व Hardware, Software कोर्स पूर्ण, नोकरी - हार्ड शॉप प्रा. लि., हुद्दा - हार्डवेअर इंजिनियर, मा. प्रा. रु. ५०००, घरी आई व दोन विवाहित बहिणी, वडील नाहीत, आवड क्रिकेट व टीव्ही पाहणे व दुसऱ्यास मदत करणे. **अपेक्षा** - उंची - ५'-३'' व शक्यतो देशस्थच हवी, २-३ वर्षाचे अंतर असावे, नोकरी सरकारी किंवा LIC मध्ये, ग्रॅज्युएट असावी, मंगळ नसावा. **संपर्क** - श्रीमती जयश्री द. देशपांडे, ९९२/३०, बी २ प्रेमानंद हौ. सोसा., राजेंद्रनगर, पुणे - ३०. फोन : ४३३४१५५.

**क्र. २३/२००४ वर** - राजीव रमेश मराठे, को.ब्रा., गोत्र - कपि, जन्म- ११.३.१९७४, उंची - ५'-१०'', वर्ण गोरा, बांधा सुदृढ, व्यंग नाही, चष्मा नाही, IMRSS या मार्केटिंग कंपनीत नोकरी, मा. प्रा. रु. ५०००, शिक्षण B.Com LLB करत आहे, आई वडील व एक भाऊ विवाहित, बालेवाडी येथे बंगला आहे, कोकणात मुर्तवडे गांवी शेती व वडिलोपार्जित घर आहे. **अपेक्षा** - कोकणस्थ, मुलगी गोरी हवी, चष्मा नको, पुण्यात नोकरी करणारी हवी, पत्रिका बघायची आहे. **संपर्क** - रमेश भिकाजी मराठे, महिमा बंगला, मैत्रेय पार्क, बालेवाडी, पुणे ४५, फोन : २७२९०९१३. धाकट्या भावाचा घरचा फोन : २५४५४६१०.

**क्र. २४/२००४ वर** - योगेश दत्तात्रय देशपांडे, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-गार्ग्य, जन्म - ८.१०.१९६७, उंची - ५'-६'', गहूवर्णी, मध्यम बांधा, O+ve, चष्मा नाही, व्यंग नाही, शिक्षण B.Com अपूर्ण, ICI कंपनीत मार्केटिंग विभागात नोकरी, पगार रु. ८०००, घरी आई वडील व दोन विवाहित बहिणी, मुलावर कोणतीही जबाबदारी नाही. **अपेक्षा** - नोकरी करणारी, १२वी पास, शक्यतो कोणत्याही ब्राह्मण शाखेची व पुण्यातील, जाड नको, **संपर्क** - श्री. दत्तात्रय भास्कर देशपांडे, १५ B, राहूलकुंज, ६१ A, रामबाग कॉलनी, चैतन्य हेल्थ क्लब जवळ, पौड रोड, पुणे ३८, फोन : २५४३४२९६.

**क्र. २५/२००४ वर** - पराग शशिकांत मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ३.५.१९७४, उंची - ५'-७'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, AB+ve, व्यंग नाही, चष्मा आहे, शिक्षण CA नोव्हेंबर २००२, V. P. Dabke & Co. मध्ये नोकरी, मा. प्रा. रु. ८०००, घरी आई वडील, मुलाला वाचनाचा व बुद्धिबळ खेळण्याचा छंद, **अपेक्षा** - उच्चशिक्षित, उंची - ५'-२'' ते ५'-४'', को.ब्रा. व नोकरी हवी, **संपर्क** - शशिकांत गोविंद मराठे, अे १/९, उत्कर्ष नगर, हडपसर, पुणे २८, फोन : २६९९०७३३.

**क्र. २६/२००४ वर** - कॅप्टन योगेश भरत देसाई, को.ब्रा., गोत्र - शांडिल्य, जन्म - ९.६.१९७७, उंची - ५'-७'', निमगोरा, सडसडीत, O+ve, व्यंग नाही, चष्मा नाही, शिक्षण B.A. (Economics), फॉरिन ट्रेड डिप्लोमा, MBA, नोकरी - सैन्यात (आर्टिलरी) अधिकारी कॅप्टन, मा. प्रा. रु. १८,०००, घरी वडील प्राध्यापक व आई गृहिणी, एका बहिणीचे लग्न झाले आहे, मुलाला ट्रेकिंग व बासरी वाजविण्याचा छंद, **अपेक्षा** - किमान पदवीधर, छंद जोपासमारी सैनिक जीवनाची जाण, ब्राह्मण (कोणत्याही उपशाखेची), **संपर्क** - भरत हरिश्चंद्र देसाई, गंगेश स्नेहनगर, नीलायम थिएटर जवळ, सदाशिव पेठ, पुणे, फोन : २४३३८१७५.

**क्र. २७/२००४ वर** - राजेश अशोक मणुरकर, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - १८.९.१९७१, उंची - ५'-८'', गोरा वर्ण, मध्यम बांधा, O+ve, शिक्षण BCS MBA, नोकरी सत्यम कॉम्प्युटरमध्ये, SAP Consultant, मा. प्रा. रु. ४०,०००, घरी आई वडील व १ विवाहित बहीण, **अपेक्षा** - अनुरूप, शाकाहारी, कोणत्याही शाखेची पदवीधर, पत्रिका पाहावयाची आहे, स्मार्ट पण नोकरीची अट नाही, **संपर्क** - श्री. अशोक गोविंद मणुरकर,गौरी कुंज बिल्डींग, हॅपी कॉलनी, ब्लॉक नं. ६ अ, लेन नं. ३, कोथरूड, पुणे, फोन : २५४४८९६५.

**क्र. २८/२००४ वर** - श्रीपाद धोंडो खरे, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - २.१२.१९६१, उंची - ५'-७'', गोरा वर्ण, मध्यम बांधा, व्यंग नाही, शिक्षण Diploma in Elect. Engg., व्यवसाय बागायत व इले कॉन्ट्रक्टर्स उत्पन्न ७०००, घरी आई वडील, १ बहीण विवाहित (पुणे), २ भाऊ, १ विवाहित - पुणे वास्तव्य, दिवे आगर, जि. रायगड येथे, छंद - तबला, पेटी वगैरे, **अपेक्षा** - अनुरूप, नोकरीची अट नाही, शिक्षण किमान मॅट्रिक, **संपर्क** - सुरेंद्र धोंडो खरे, जी. ५/५, ओंकार गार्डन, माणिक बाग, सिंहगड रस्ता, पुणे ५१, फोन : २४३५१५११.

**क्र. २९/२००४ वर** - हनुमंत धोंडो खरे, को.ब्रा., गोत्र-कौशिक, जन्म - १४.१.१९६५, उंची - ५'-८'', गोरा वर्ण, सडपातळ, व्यंग नाही, शिक्षण Printing Technology Double Diploma, नोकरी - Printing & DTP Partner, मा. प्रा. रु. ७०००, घरी आई, वडील, १ मोठी बहीण विवाहित (पुणे), २ भाऊ, १ विवाहित - पुणे, छंद - तबला, कॅरम वगैरे, **अपेक्षा** - अनुरूप, नोकरीस प्राधान्य, **संपर्क** - सुरेंद्र धोंडो खरे, जी. ५/५, ओंकार गार्डन, माणिकं बाग, सिंहगड रस्ता, पुणे ५१, फोन : २४३५१५११.

**क्र. ३०/२००४ वर** - गणेश अनंत डांगे, गौड सारस्वत ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - १९६४, उंची - ५'-६'', गहूवर्णी, O+ve, व्यंग नाही, शिक्षण नॉन मॅट्रिक, सरकारी नोकरी पुणे विद्यापीठ प्लंबर, मा. प्रा. रु. ६०००, घरी आई व ३ भावंडे (२ भाऊ व १ बहीण), **अपेक्षा** - उंची - ५'-४'', वय ३५ पर्यंत, नोकरी असली तरी चालेल, राहणीमान साधे व ब्राह्मण उपशाखेतील चालेल, **संपर्क** - अनंत रा. डांगे, मधुबन सोसायटी, गल्ली नं. ५, फ्लॅट नं. ५, जुनी सांगली २७, फोन : २७२८७४६५.

**क्र. ३१/२००४ वर** - प्रसाद सदाशिव मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - २५.२.१९७६, उंची - ५'-२'', गोरा वर्ण, सुदृढ, BSC, आयुर्वेदिक कंपनीत नोकरी, व HDFC चा एजंट, केमिस्ट, मा. प्रा. रु. ५०००, घरी आई-वडील व ४ विवाहित बहिणी, स्वत:चे घर आहे, मुलावर कोणतीही जबाबदारी नाही, वडील पौरोहित्य करतात, मुलगा धार्मिक प्रवृत्तीचा, **अपेक्षा** - पदवीधर, कोकणस्थ, नोकरी करणारी पण शक्यतो पिंपरी चिंचवड परिसरातील मनमोकळ्या स्वभावाची हवी, **संपर्क** - श्री. सदाशिव विठ्ठल मराठे, देहूरोड विकासनगर, मराठी शाळेजवळ, जि. पुणे, ता. हवेली, मु. पो. देहूरोड ४१२२०२ फोन : ७६७५२७१.

**क्र. ३२/२००४ वर** - रोशनकुमार भरत जोशी, देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - १८.६.१९७९, उंची - ५'-८'', वर्ण गोरा, O+ve, शिक्षण - Electrical Engineer Diploma & Computer Diploma, नोकरी - कॉम्प्युटर हार्डवेअर ॲन्ड सॉफ्टवेअर कं. नाशिक, घरी आई वडील व १ लहान भाऊ, भावाचा स्वतंत्र व्यवसाय, आवड - क्रिकेट व संगीत ऐकणे, टीव्ही पाहाणे व मित्रपरिवार वाढविणे, **संपर्क** - भरत गंगाधर जोशी, अंबर ओंकारनगर, आशिश सोसायटी, म्हसरुळ मखमलाबाद लिंक रोड, पेठ रोड, जुन्या जकात नाक्यामागे, नाशिक ४२२००४. फोन : २५३१००९.

**क्र. ३३/२००४ वर** - भूषण प्रकाश फडणीस, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-शांडिल्य, जन्म - २०.४.१९७६, उंची - ५'-१०'', सुदृढ, गोरा, MSc Agriculture, नोकरी रानडे इन्स्टीट्यूट, कोंढवा येथे संशोधक, मा. प्रा. रु. १५,०००, मुलाला आई वडील, १ लहान भाऊ व १ लहान बहीण आहे, दोघेही अविवाहित, लिखाण करणे व गाणी ऐकण्याचा छंद, **संपर्क** - काका श्री. शशीकांत पुरुषोत्तम फडणीस, जे-६, अमरलता, हडपसर, पुणे २८, फोन : २६९९०८४१.

**क्र. ३४/२००४ वर** - पंकज सुरेश फडणीस, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्म - ऑक्टोबर १९७३, उंची - ५'-६'', गोरा, देखणा, B.Com, LLB, एअर टेल कंपनीत नोकरी, लॉ ऑफीसर, मा. प्रा. रु. ३० ते ३५ हजार, आई वडील, १ मोठा भाऊ विवाहित, १ लहान बहीण अविवाहित, **संपर्क** - काका श्री. शशीकांत पुरुषोत्तम फडणीस, जे-६, अमरलता, हडपसर, पुणे २८, फोन : २६९९०८४१.

**क्र. ३५/२००४ वधू** - अवंती अरविंद अभ्यंकर, को.ब्रा., गोत्र-वसिष्ठ, जन्म - २.१२.१९७५, उंची - ४'-११'', वर्ण सावळा, मध्यम बांधा, O+ve, Accident मुळे Skin grafting केले आहे, शिक्षण - MCom Dip. in Comp. Appl. Diploma in Foreign Trade, फ्रेंच शिक्षण चालू, आई वडील, १ मोठा अविवाहित भाऊ व बहीण नाही, चित्रकलेची आवड, **अपेक्षा** - वयात फार अंतर नको, नोकरी करणारा, कोकणस्थ, उत्पन्न १०,००० पर्यंत, स्वत:चे घर असावे, **संपर्क** - अरविंद शंकर अभ्यंकर, प्लॉट नं. ५३, सहकारनगर नं. २, तुळशीबागवाले कॉलनी गल्ली कं ४ अ, पुणे ४११००९, फोन : २४२२०१७५.

**क्र. ३६/२००४ वधू** - मेधा नारायण मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - ३१.८.१९८१, उंची - ५'-३'', वर्ण गोरा मध्यम, O+ve, शिक्षण MA II सुरु, अर्थशास्त्र, आई वडील व १ लहान भाऊ, १ लहान बहीण शिकत आहे, **अपेक्षा** - शक्यतो सरकारी नोकरी व स्वत:चा धंदा असेल तर तो स्थिर व उत्पन्न चांगले असावे. वय २६ च्या आत असावे,

को.ब्रा. व कुटुंब बेताचे असावे, **संपर्क** - श्री. नारायण रामचंद्र मराठे, मु. पो. पुरळ, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग, फोन : ९५२३६४-२२९२७०.

**क्र. ३७/२००४ वधू** - दीपाली भालचंद्र पाठक, यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण, गोत्र-कौशिक, जन्म - ५.१२.१९७४, उंची - ५'-३'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, O+ve, व्यंग नाही, चष्मा आहे, BSc & Computer Course झालेला आहे, Computer Agency मध्ये कॉम्प्युटर ऑपरेटरची नोकरी, मा. प्रा. रु. ३०००, आई वडील व ५ बहिणींपैकी ३ विवाहित, १ लहान बहीण, **अपेक्षा** - पदवीधर, चांगली नोकरी, रु. १०,००० महिना, कोणत्याही गावातील व कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेचा चालेल, **संपर्क** - श्री. भालचंद्र विश्वनाथ पाठक, फ्लॅट नं. १, चैतन्य अपार्टमेंट, श्रीजयनगर समोर, इंदिरानगर, नाशिक ४२२००९, फोन : ९५२५३-२३२७७५८.

**क्र. ३८/२००४ वधू** - अमृता श्रीकृष्ण जोशी, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-भारद्वाज, जन्म - २५.६.१९८२, उंची - ५'-४'', सावळा वर्ण, मध्यम बांधा, A+ve, चष्मा आहे, शिक्षण - टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्सचा २ वर्षाचा कोर्स पूर्ण, BA, English फर्स्ट क्लास, जर्मन मॅक्समुलरच्या २ परीक्षा पास, एम.ए. प्रथम वर्ष चालू, Part time नोकरी, मा. प्रा. रु. १०००, घरी आई वडील व मोठा भाऊ अविवाहित, छंद - लेखन, वाचन, स्वयंपाक व घरकामात रस व सहली आयोजित करते, **अपेक्षा** - देशस्थ, चांगली नोकरी किंवा स्थिर व्यवसाय असलेला, निर्व्यसनी आणि सुसंस्कृत, **संपर्क** - श्रीकृष्ण वासुदेव जोशी, अरुपर्ण, प्लॉट नं. ९, पुष्कराज हाऊसिंग सोसायटी, धनकवडी, पुणे ४११०४३, फोन : ४३७०६१८.

**क्र. ३९/२००४ वधू** - वैशाली शशिकांत मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - १०.९.१९६८, उंची - ५'-३ १/२'', वर्ण गोरा, मध्यम बांधा, व्यंग नाही, शिक्षण B.Com, Interior Decoration चा डिप्लोमा Internet व Computer Course, मुलीचे स्वत:चे पेरुगेटजवळ खाद्यपदार्थाचे दुकान आहे, घरी वडील व एक भाऊ विवाहित, **अपेक्षा** - शक्यतो पुण्यातील, कोणत्याही ब्राह्मण शाखेचा, नोकरी किंवा धंदा काही चालेल पण उत्पन्न शक्यतो १० हजार किंवा पुढे, **संपर्क** - श्री. शशिकांत भास्कर मराठे, ११७८/२०, धोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००५. फोन : ५५३५१८५, ज्ञानेश मंगल कार्यालय, फोन : ५५३४६१७.

**क्र. ४०/२००४ वधू** - अश्विनी रघुनाथ मराठे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - १९.६.१९७६, उंची - ५'-५'', वर्ण निमगोरा, मध्यम बांधा, O+ve, व्यंग नाही, चष्मा नाही, शिक्षण - BA, (Eng) Computer Course, खाजगी नोकरी, Office Assistant, मा. प्रा. रु. ४५००, घरी आई वडील, छंद - संगीत, प्रवास, पेंटींग, शिवणकाम व भरतकाम, **अपेक्षा** - उंची - ५'-७'', शिक्षण पदवीधर व उत्पन्न १०,००० च्या पुढे, **संपर्क** - श्री. रघुनाथ गोविंद मराठे, १०४० सदाशिव पेठ, बहार, पुणे ४११०३०, फोन : २४४८५५९४.

**क्र. ४१/२००४ वधू** - अर्चना पद्माकर वडनेरकर, सोनार जात (अहिर सोनार), गोत्र-गोवत्स, जन्म - २९.११.१९७०, उंची - ५'-४'', गव्हाळ वर्ण, सडपातळ बांधा, व्यंग नाही, चष्मा नाही, शिक्षण - M.Com., नोकरी - ग्राहक पेठे येथे ऑफिसर, मा. प्रा. रु. ३५००, घरी आई आहे, वडील नाहीत, २ भाऊ व २ बहिणी विवाहित, **अपेक्षा** - नोकरी किंवा व्यवसाय, पण अनुरूप हवा, कोणत्याही जातीचा चालेल, मराठा, ब्राह्मण, सोनार चालेल. **संपर्क** - श्री. प्रविण पद्माकर वडनेरकर (भाऊ), ६४२, नारायण पेठ, पुणे ३०.

**क्र. ४२/२००४ वधू** - ग्रेस विश्वनाथ गोळे, को.ब्रा., गोत्र-भारद्वाज, जन्म - २१.४.१९८०, उंची - ५'-७'', सौम्य मंगळ, वर्ण गोरा, सडपातळ बांधा, O+ve, शिक्षण - BE, Chemical Engineer, 1st class with distinction, नोकरी - NCL मध्ये Project Assistant, मा. प्रा. रु. ५५००, आई सरकारी नोकरी करते, वडील पूर्वी Philps मध्ये होते, VRS घेऊन सध्या औरंगाबादमध्ये Job करतात, १ लहान भाऊ शिकत आहे, **अपेक्षा** - उंच, कोणत्याही ब्राह्मण शाखेचा, उच्चशिक्षित, २० हजाराच्या पुढे उत्पन्न, निर्व्यसनी पाहिजे, **संपर्क** - श्री. विश्वनाथ बाळकृष्ण गोळे, ९ सुगंध हौ. सोसा., लॉ कॉलेज समोर, पुणे ४११००४, फोन : २५६५८३९४.

**क्र. ४३/२००४ वधू** - वृषाली माधव खांबेटे, को.ब्रा., गोत्र-कपि, जन्म - १५.२.१९८८, उंची - ५'-१'', गोरी, स्मार्ट, चष्मा आहे, शिक्षण - बी.ए. (पोलीटीकल सायन्स) मुंबई युनिव्हर्सिटी, सध्या मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे पत्रकारितेचा कोर्स करते आहे. नोकरीचा शोध चालू आहे, आई शाळेत शिक्षिका, वडील सरकारी नोकरी, मुलीस आजी आजोबा आहेत, **अपेक्षा** - शक्यतो मुंबई, पुणे येथील स्थायिक, कायम नोकरी, **संपर्क** - माधव खांबेटे, ३४ शीव (पूर्व), मुंबई ४०००२२. फोन : ३०९२२६२९, मोबाईल : ९८२१३७३५१५.

***

## सालंकृत कन्यादान

'सालंकृत कन्यादान' यामधे वापरलेला कन्यादान हा शब्द मुळातच चुकीचा आहे. कन्येचे 'दान' करणे हा प्रकारच अर्थशून्य आहे. दान हे वस्तूचे होऊ शकते, कन्येचे नाही. वास्तविक विवाहसमारंभ म्हणजे एकमेकांची गरज भागवण्यासाठी अंमलात आणलेला एक मंगल सोहळा आहे. येथे कोणी कोणाला दान करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. 'कन्यादान' हा शब्दच निंद्य असून या भावनेचा त्याग झाला पाहिजे.

विवाहसोहळा म्हणजे वधूपिता आपली मुलगी तिच्या पतीच्या स्वाधीन अत्यंत विश्वासाने व श्रद्धेने सुपूर्द करीत असतो. या दृष्टीने 'कन्यादान' ऐवजी 'कन्या प्रतिष्ठान' असाच शब्दप्रयोग केला पाहिजे. सालंकृत कन्यादान या प्रकारातील दांभिकतेचा त्याग करून वास्तवतेचा स्वीकार करायला हवा.

**- सद्गुरु वामनराव पै**

## घरगुती सेवा शुश्रुषा व्यवसाय

आजच्या या बदलत्या युगात पोळी भाजी केंद्र, पाळणाघरे, घराची साफसफाई, वैद्यकीय तपासणी अशा प्रकारच्या सेवा सुरू झाल्या आहेत. याच धर्तीवर घरगुती सेवाशुश्रुषा केंद्रे मोठ्या प्रमाणावर निघण्याची गरज आहे. वृद्धांच्या दैनंदिन गरजा या केंद्राच्या माध्यमातून पुरवणे ही या व्यवसायाची संकल्पना होय. ह्यामध्ये १) घराची देखभाल २) भांडी घासणे ३) कपडे धुणे, लाद्या पुसणे ४) दूध आणणे ५) भाजी आणून चिरून देणे ६) किराणा सामान आणणे ७) बँकांची लहानमोठी कामे करणे ८) पत्रव्यवहार करणे ९) वृद्धांना डॉक्टरांकडे नेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी करुन घेणे १०) त्यांचे औषध पाणी तसेच त्यांना पथ्यकारक आहार देणे ११) त्यांना वर्तमानपत्रे वा इतर आवडीची पुस्तके वाचून दाखवणे १२) त्यांना जवळपास थोडेफार फिरवून आणणे यासारख्या सेवांचा समावेश होऊ शकेल.

या व्यवसायात अनेक बेकारांना रोजगाराची संधी मिळू शकेल. तसेच युवकांना ते शिकत असतानाच त्यांच्या अंगी सेवावृत्ती बाणवता येऊ शकेल.

## या अंकात


१. **१०वी १२वी नंतर पुढे काय?**.................. पृ.१

२. **अर्थार्जनाचे साधन - स्वयंरोजगार**............... पृ.१
रामचंद्र नाडकर्णी

३. **लॉकिमचे कॉल सेंटर प्रशिक्षण केंद्र**............. पृ.२

४. **यशस्वी नाट्यव्यावसायिक - बळवंत भास्कर मराठे**.. पृ.४
सीताराम गोपाळ खांबेटे, अंधेरी, मुंबई

५. **राधाबाई परांजपे यांचे आत्मकथन - अंतरीची हाक**... पृ.४
सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, वडाळा, मुंबई

६. **ओढ हिमालयाची**.............................. पृ.६
विंग कमांडर (नि) यशवन्त लक्ष्मण मराठे, पुणे

७. **यशस्वी उद्योजक मनोहर महंते**.................. पृ.६
प्रेषक - हेमंत अरुण मराठे, नालासोपारा, जि. ठाणे

८. **सुखी जीवनाचा मूलमंत्र**........................ पृ.७
सौ. विद्या सुनिल चक्रदेव, मुलुंड, मुंबई

९. **गजाआडचे गुणवान - कारागृह निष्ठा!**.......... पृ.८
अच्युत महादेव चक्रदेव, पुणे

१०. **स्वयंरोजगारासाठी सहाय्य योजना**.............. पृ.८
प्रेषक - हेमंत अरुण, नालासोपारा, जि. ठाणे

११. **सागराला गवसणी घालणारी गलेलठ्ठ पगाराची नोकरी** ..पृ.८

१२. **घरगुती सेवा शुश्रुषा व्यवसाय**................ पृ.१२


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३), **अभिनंदनीय** (पृ.३) आणि **विवाह सहाय्य** (पृ.९ ते ११) **ही नेहमीची सदरे.**

बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)